# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### अंगणवाडीत दिला जाणाऱ्या पोषण आहाराबाबत

**(१) २१८४ (२२-१२-२०१४). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा पुरक आहाराच्या पाकिटांपाठोपाठ अंगणवाडीमधुन देण्यात येत असलेली खिचडी व कडधान्याची उसळीमध्ये पुरेशा प्रमाणात पोषक घटकही नसतात, हे खरे आहे काय,

(२) तसेच, खिचडीत तेल न घालताच केवळ पाणी मीठ घालून पदार्थ शिजवले जातात त्यामुळे बेचव बनलेल्या या अन्नाकडे मुले पाठ फिरवतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने स्थानिक पातळीवरुन पुरक आहार महिला मंडळ व बचतगटाच्या माध्यमातुन पुरवण्याचा निर्णय घेतला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अंगणवाडीत दिला जाणारा पोषक आहाराबाबत शासनस्तरावर काय निर्णय घेण्यात आल आहे व निर्णयाची अंमलबजावणी केव्हापासून होणार आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-०२-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. १९६/२००१ मध्ये दिनांक ७ ऑक्टोबर, २००४ रोजी एकात्मिक बाल सेवा योजनेअंतर्गत पुरक पोषण आहार पुरवठा कंत्राटदारामार्फत करण्यात येऊ नये. पुरक पोषण आहार पुरवठयाचे आणि आहार शिजविण्याचे काम स्वयंसहाय्यता बचत गट / महिला मंडळ / ग्राम समुदाय यांचेमार्फत करण्यात यावे, असे आदेश दिलेले आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश विचारात घेऊन एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत ग्रामीण / आदिवासी आणि नागरी प्रकल्पातील सर्व अंगणवाडी केंद्रांमध्ये स्वयंसहाय्यता बचत गट / महिला मंडळ यांचेमार्फत शिजवून तयार खाद्यान्न स्वरुपात (Ready to eat) पुरक पोषण आहार पुरविण्यात यावा, असा शासन निर्णय दिनांक २८/१०/२००५ रोजी निर्गमित केला होता.

त्यानंतर केंद्र शासनाने संपूर्ण बाल पोषण पध्दतीमध्ये व्यापक बदल करण्याच्या दिनांक २४/०२/२००९ च्या पत्रान्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचना आणि मा. सर्वोच्च न्यायालयाचे दिनांक २२/०४/२००९ च्या आदेशानुसार एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील सर्व बालके, गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता आणि ३ वर्षे ते ६ वर्षे वयोगटातील तीव्र कमी वजनाची बालके यांना घरपोच आहार (THR) तसेच ३ वर्षे ते ६ वर्षे वयोगटातील लाभार्थ्यांना सकाळचा नास्ता व गरम ताजा आहार पुरविण्याच्या सूचना दिनांक २४/०८/२००९ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

त्याप्रमाणे घरपोच आहार (THR) व गरम ताजा आहाराचा अंगणवाडी केंद्रातील लाभार्थ्यांना पुरवठा करण्यासाठी जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय आहार समितीमार्फत स्थानिक महिला बचत गट, महिला मंडळ व ग्राम समुदाय यांची निवड करुन त्यांचेमार्फत पुरवठा करण्याबाबत वरील शासन निर्णयाद्वारे निर्देश दिलेले असून सदर निर्णयाची अंमलबजावणी सुरु आहे.

---

**राज्यात व विशेषत: पूर्व विदर्भात पिडीत जमिनीचा ७/१२ शासन झुडपी जंगल या नावावरुन रद्द करुन बांधलेल्या पक्के घरांना मालकी पट्टे देण्याबाबत**

**(२) ४०५३ (२२-१२-२०१४). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात व विशेषत: पूर्व विदर्भात प्रमुख लोकवस्ती लगत शासकीय जमिनीवर झुडपी जंगल असे पट्टे नमुद असून अनेक वर्षापासून त्या जमिनीवर जंगलच काय साधी झाडे पण नाहीत त्या पडीत जागेचा लोकांनी वापर केला असून सदरहू उक्त जागेवर मालकी हक्काचे पटटे करण्याबाबतची मागणी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त पिडीत जमिनीचा ७/१२ शासन झुडपी जंगल या नावावरुन रद्द करुन बांधलेल्या पक्के घरांना मालकी पटटे देण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणता निर्णय घेतला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०२-२०१५) :** (१) झुडपी जंगल जमिनीवर संबंधित जमिनीचा वापर करणाऱ्या लोकांनी त्यांना या जमिनीचे मालकी हक्काचे पट्टे मिळावे अशा स्वरपाची मागणी फार वर्षापासून केली आहे.

(२) केंद्र शासनाने दिनांक १२/०२/१९९२ अन्वये दिलेल्या खुलाशाप्रमाणे तसेच सर्वोच्च न्यायालयातील रिट याचिका क्र. २०२/१९९५ मधील दिनांक १२/१२/१९९६ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे कोणत्याही शासकीय अभिलेख्यात वन म्हणून नोंद केलेल्या क्षेत्रास वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या तरतूदी लागू राहतात त्यामुळे अशा क्षेत्राचे ७/१२ वरुन झुडपी जंगल ही नोंद केंद्र शासनाचे पूर्व परवानगी शिवाय रद्द करता येत नाही. मात्र गैरवाणिज्यिक वनेत्तर प्रयोजनाखाली असलेले क्षेत्र केंद्र शासनाने दिनांक ०४/०३/२०१४ अन्वये विहीत केलेल्या सुलभ कार्यपध्दतीप्रमाणे नियमित करण्याच्या सूचना आहेत.

तसेच अनुसूचित जमती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ आणि नियम २००८ मधील तरतूदीनुसार संबंधित झुडपी जंगल धारकाने शेती किंवा वास्तव्याकरिता वापरत असलेल्या क्षेत्राबाबत दावा दाखल केला असल्यास या अधिनियमाखालील पात्रतेचे निकषानुसार ते पात्र ठरल्यास त्यांना अशा जमिनीचे हक्कपत्र जिल्हास्तरीय समितीमार्फत देण्याची तरतूद आहे. या अधिनियमांतर्गत हक्कपत्र देताना वन (संवर्धन) अधिनियम, १९८० पासून सूट दिलेला आहे, परंतु मालकी मात्र शासनाचीच राहणार आहे.

(३) शासनाने उपरोक्त संदर्भात झुडपी जंगल क्षेत्रापैकी अतिक्रमणाखालील क्षेत्र, वनेत्तर वापराखालील क्षेत्र व तुकडया तुकडयातील क्षेत्र निर्वणीकरण करण्याचे ठरविले असून त्यासाठी दिनांक ३१/०७/२०१३ अन्वये सुलभ कार्यपध्दती प्रस्तावित केली होती. त्यास केंद्र शासनाकडील मार्गदर्शक तत्वे दिनांक ०४/०३/२०१४ अन्वये मंजूरी प्राप्त झाली आहे. त्यानुसार विभागीय आयुक्त, नागपूर यांना प्रस्ताव तयार करुन शासनास सादर करण्यात सूचीत केलेले आहे. याबाबत महसूल विभागाचे स्तरावर गावनिहाय आकडेवारी संकलीत करुन प्रस्ताव तयार करणेबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### जालना लघुसिंचन जलसंधारण उप व्रिभाग अंबड, धनसावंगी भोकरदन येथे कार्यरत असलेले उप विभागीय अभियंता यांनी केलेला गैरव्यवहार

**(३) ७८३२ (०९-०४-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना लघुसिंचन जलसंधारण उपविभाग अंबड, घनसावंगी, भोकरदन येथे कार्यरत असलेले ए.ए.कांबळे, उपविभागीय अभियंता यांनी केलेल्या भ्रष्टाचार व बोगस कामांची मुख्य सचिवांनी लावलेली चौकशी संथ गतीने होत असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ डिसेंबर, २०१४ रोजी मुख्य अभियंता, लघुसिंचन जलसंधारण, जेल रोड, येरवडा, पुणे यांनी लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणाची चौकशी संथगतीने होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याप्रकरणाची चौकशी तातडीने पुर्ण करण्याकरिता शासन कोणती कारवाई करीत आहे वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-१०-२०१५) :** (१) होय. तथापि, या संदर्भात मुख्य सचिवांकडून चौकशी करण्याबाबत आदेश देण्यात आलेले नाहीत.

(२) या संदर्भात, कायर्कारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) विभाग, जालना, यांनी प्राथमिक चौकशी केली असून सदर प्रकरणामध्ये तथ्य आढळून आलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे हाळी (ता.देगलूर, जि. नांदेड) येथील कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा मंजूरी बाबतचा प्रस्ताव**

**(४) १०४२८ (०७-०४-२०१५). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे हाळी (ता.देगलूर, जि.नांदेड) येथील कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा मंजूरी बाबतचा प्रस्ताव शासनाकडे गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहे काय,

(२) असल्यास, प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,

(३) उक्त को.प.बंधारा मंजूरी बाबत शासनाची निश्चित भुमिका काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०६-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

हाळी कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा तालुका देगलूर, जिल्हा नांदेड या योजनेचा प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव सन २००२ मध्ये महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ यांचेकडे सादर करण्यात आला होता.

(२) प्रस्तावित जागा तांत्रिक दृष्टया योग्य नसल्याने योजना असफल होते.

(३) तांत्रिक दृष्टया योजना असफल असल्याने मंजूरीची कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**एकात्मिक बालविकास योजनेअंतर्गत प्रत्येक गावांमध्ये अंगणवाडया सुरु करण्याबाबत**

**(५) १०६३४ (०७-०४-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक - बालविकास योजनेअंतर्गत राज्यामध्ये दर १००० लोकसंख्येकरिता शासनाने राज्यातील प्रत्येक गावांमध्ये अंगणवाड्र्या सुरु केल्या आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्हा अंगणवाडी कर्मचारी संघ, कोल्हापूर यांनी दिनांक २४ नोव्हेंबर, २०१४ रोजी च्या सुमारास अंगणवाडी सेविकांच्या विविध प्रश्नांसंदर्भात मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, कोल्हापूर यांना एक लेखी निवेदन दिले हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनात कोणत्या मागण्या केल्या आहेत व सदर मागण्या सोडविण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-०९-२०१५) :** (१) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत १००० लोकसंख्या असलेल्या गावात अंगणवाडी केंद्र सुरु करता येते. अंगणवाडी केंद्र सुरु करण्यासाठी केंद्र शासनाची मंजुरी आवश्यक आहे.

(२) कोल्हापूर जिल्हा अंगणवाडी कर्मचारी संघ, कोल्हापूर यांनी दिनांक १० नोव्हेंबर, २०१४ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना विविध मागण्यांबाबत निवेदन दिले आहे.

(३) अंगणवाडी सेविका, मदतनीस यांना पेन्शन लागू करावी, किमान वेतन कायदा लागू करावा, भाऊबीज भेट देण्यात यावी, वैद्‌यकीय रजा मंजूर करावी, अंगणवाडीतील ६ महिने ते

३ वर्षे वयोगटातील बालकांना THR बंद करावा, इ. प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. तर काही मागण्या मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, स्तरावरील आहेत.

जिल्हा परिषद स्तरावरील मागण्यांबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना सूचना दिलेल्या आहेत.

शासन स्तरावरील मागण्यापैकी पेन्शन (एकरक्कमी लाभ) देणेबाबत योजनेबाबत दिनांक ३० एप्रिल, २०१४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. तसेच भाऊबीज भेट देण्याची बाब विचाराधीन आहे. उर्वरित मागण्यांबाबत आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांच्या स्तरावर छाननी करुन आवश्यक प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

---

**उस्मानाबाद जिल्हयातील पाझर तलावाच्या दुरुस्तीबाबत**

**(६) ११०२६ (०६-०४-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुष्काळी परिस्थितीवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी जिल्हापरिषदेच्या लघुपाटबंधारे विभागाने उस्मानाबाद जिल्हयातील पाझर तलावाच्या दुरुस्तीसाठी माहे जानेवारी, २०१५ मध्ये रुपये ११४ कोटीचा आराखडा तयार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यासाठी लागणा-या निधीची तरतूद शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, सदर दुरुस्ती पूर्ण होण्यास किती कालावधी अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, सदर निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०६-१०-२०१५) :** (१), (२), (३) व (४) होय, तथापि ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमता असलेल्या प्रकल्पांचे परिरक्षण व दुरुस्ती या योजनेंतर्गत लेखाशीर्ष संकेतांक क्रमांक २७०२ १४७९ खाली निधी मिळण्यासाठी, शासन पत्र दिनांक ७/११/२०१३ अन्वये निर्धारित केलेल्या कार्यपध्दतीचे अनुपालन करुन परिपुर्ण प्रस्ताव संबंधित मंडळ कार्यालय व मुख्य अभियंता कार्यालय यांचे शिफारशीने शासनास सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून यथायोग्य प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार शासनाकडून उचित निर्णय घेण्यात यईल.

---

**सावर्डे खोतवाडी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील पाझर तलावाबाबत**

**(७) १२४५८ (०८-०४-२०१५). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावर्डे खोतवाडी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथे पाझर तलाव होणेसाठी आवश्यक क्षेत्र उपलब्ध असून योजनेसाठी जलसंधारण खात्यामार्फत यापुर्वी सर्व्हेक्षण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी पाझर तलाव झाल्यास परिसरातील ग्रामस्थ व शेतकरी यांना पिण्यासाठी व शेतीसाठी पाणी उपलब्ध होणार असून परिसरातील पाण्याचे स्त्रोतही बळकट होण्यास मदत होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी पाझर तलाव होणे करीता स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ जानेवारी २०१५ रोजी लघु सिंचन (जलसंधारण) विभाग रत्नागिरी यांचेकडे पत्र देऊन पुर्ननिरिक्षण करणेची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तदनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-१०-२०१५) :** (१), (२) व (३) होय.

(४) यापूर्वी प्रस्तावित केलेला पाझर तलाव मापदंडात बसत नसल्यामुळे प्रशासकीय मंजूरी प्राप्त झालेली नाही. तथापि, पाझर तलावाऐवजी लघु पाटबंधारे योजना व्यवहार्य होऊ शकेल असे प्राथमिक पाहणीत दिसून येते. त्यादृष्टीने पुन:श्च सविस्तर सर्वेक्षण व अन्वेषण करणेत येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे भादोला (ता.जि.बुलढाणा) येथील पाझर तलावाबाबत**

**(८) १४२०३ (०८-०४-२०१५). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भादोला (ता.जि.बुलढाणा) येथे गावाच्या वायव्येस पाझर तलावाचे काम सुरु असून त्याची पाणी साठवण क्षमता १५० टी.एम.सी. एवढी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असलेल्या पाझर तलावाच्या नदीवरुन ३५० टी.एम.सी. पाणी उपलब्ध असून केवळ १५० टी.एम.सी. पाणी अडविल्या जात असल्याने उर्वरित २०० टी.एम.सी. पाणी वाया जावू नये यासाठी तेथे पुन्हा दुस-या पाझर तलावाचे सर्वेक्षण करुन तलावाचे काम करण्यात यावे अशी मागणी ऑगस्ट किंवा सप्टेंबर, २०१४ वा त्या सुमारास तत्कालीन लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) विभाग (लोकल सेक्टर) बुलढाणा (ता.जि.बुलढाणा) यांचेकडे लेखी निवेदनद्वारे केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ह्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली अथवा करिता आहे विलंबाची कारणे कोणती ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-१०-२०१५) :** (१) व (२) होय.

(३) काम सुरु असलेल्या, भादोला पाझर तलावाचे वरील बाजूस तलाव क्र.२ चे सर्वेक्षण करण्यात आले असून अंदाजपत्रक तयार करण्याचे काम प्रगतीत आहे.

---

### शिरोळ तालुक्यातील (जि.कोल्हापूर) गावतळ्यांची दुरुस्तीबाबत

**(९) १६१८२ (०९-०४-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरोळ तालुक्यातील (जि.कोल्हापूर) उदगांव, दमळवाड, टनांदणी, निमशिरगांव, चिपरी, हेरवाड, लाटवाडी, जांभळी, शिरदवाड, टाकळीवाडी, अकिवाट, टाकळी, शिरढोण, टाकवडे, तेटवाड, घोटवाड, जैतापूर, कोंडिग्रे शेडशळ येथील गावतळ्यांचे रुपांतर डबक्यात झाल्याचे नुकतेच उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तळ्यांची दुरुस्ती करुन त्यातील गाळ काढण्यासाड़ी शासनाने नागरिकांनी तसेच सर्व पक्षीय लोकप्रतिनिधींनी वारंवार मागणी केला आहे काय,

(३) असल्यास, या तालावातील गाळ काढून तातडीने दुरुस्ती करण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(४) अद्यापही कोणत्याच उपाययोजना केलया नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-१०-२०१५) :** (१) नाही.

(२) सदरच्या गाव तलावामध्ये पाण गवत वाढलेले आहे, तलावात गाळ आहे व त्यामुळे गाव तलावातील पाणी काही अंशी दुषीत झालेले आहे. त्यामुळे सदर गाव तलावांची दुरुस्ती करुन गाळ काढण्याची मागणी नागरीक व लोकप्रतिनिधी यांचेकडून करणेत आलेली आहे.

(३) गाव तलावातील गाळ काढून दुरुस्ती करण्यासाठीचे अंदाजपत्रक तयार करुन केंद्र शासनाच्या दुरुस्ती, नुतनीकरण व पुर्नस्थापना या योजनेंतर्गत अंदाजपत्रके शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यातील बालगृहाचा अन्न धान्य पुरवठा बंद झाल्याबाबत

**(१०) १६२७४ (१९-०८-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या मान्यतेने राज्यात स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणा-या अनाथ, निराधार बालकांच्या शिक्षण संगोपन आणि संरक्षणाचे काम करणा-या बालगृहांना देण्यासाठीची १०८ कोटीची पुरक मागणी गत सत्रात सादर न केल्याने पुरवठादारांना थकित देयके न मिळाल्याने किराणा माल देणे बंद केल्याने संस्थाचालकांची मोठ्याप्रमाणात गैरसोय होत असून

अनाथ बालकांना सांभाळणा-या सेवकांनाही वेतन न मिळाल्यामुळे त्यांनीही काम सोडल्याने बालकांच्या संगोपन व पुनर्वसन कामात बाधा निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार बालगृहांना तातडीने अनुदान देण्याच्या कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्य शासनाच्या मनोधैर्य योजनेच्या अर्जदारांना मदत मिळत नसल्याबाबत

**(११) १६५८६ (१२-०८-२०१५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१)राज्य शासनाने मुंबईतील शक्ती मील येथे एका तरुणीवर झालेल्या बलात्काराच्या घटनेनंतर 'मनोधैर्य योजना' माहे ऑक्टोबर, २०१३ मध्ये सुरु करण्यात आली होती या योजनेअंतर्गत बलात्कार पीडित महिलेला २ लाख रुपये आणि अॅसिड हल्ल्यात बळी पडलेल्या महिलेला ५० हजार रुपये मदत देण्याची योजना आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेनुसार मदत मिळावी म्हणून गेल्या दोन वर्षात आलेल्या अर्जापैकी साधारण पन्नास टक्के अर्जदारांना मदत देण्यात आलेली नसल्याचे व जिल्हा स्तरावर नेमण्यात आलेल्या समित्याही कार्यरत नसल्याचे माहे मे २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-१०-२०१५) :** (१) होय, तथापि अॅसिड हल्ल्यात जखमी झालेल्या महिला व बालकांस त्यांचा चेहरा विद्रुप झाल्यास अथवा कायमचे अपंगत्व आल्यास रु. ३.०० लाख अर्थसहाय्य दिले जातात व अॅसिड हल्ल्यात इतर जखमा झाल्यास महिला व बालकांस रु. ५० हजार अर्थसहाय्य दिले जातात.
(२) नाही.
(३) या योजनेंतर्गत शासनाने सन २०१३-१४ करीता रु. ५,०४,४५,०००/-, सन २०१४-१५ करीता रु. ३५,१०,९०,०००/- व सन २०१५-१६ करीता रु. २१,८७,००,०००/- इतकी तरतूद केलेली आहे. त्यानुसार संबंधित जिल्हयांमार्फत लाभार्थ्यांना अर्थसहाय्य करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पर्यटन स्थळाचा विकास या राज्य योजने अंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपूरी येथील वनवसाहत येथे वनउद्यान तयार करण्याबाबत**

**(१२) १६६६५ (१७-०२-०१५०). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पर्यटन स्थळाचा विकास (Forest Park) (२४०६ २२८६) या राज्य योजने अंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपूरी येथील वनवसाहत येथे वनउद्यान तयार करण्याकरीता २५६.६८ लक्ष रुपये अंदाजपत्रक असलेला प्रस्ताव उपवनसरंक्षक ब्रम्हपूरी यांनी दिनांक १८ फेब्रुवारी, २०१५ रोजी मुख्य वनसंरक्षक चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर यांच्याकडे पाठविलेला असताना सुध्दा अद्यापही सदर प्रस्तावास मंजूरी मिळालेली नसल्याची माहिती माहे दिनाक ३० मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावास तातडीने मंजूरी मिळण्यासाठी लोकप्रतिनिधी यांनी मा.वन मंत्री, प्रधान सचिव वने, मुख्य वनसंरक्षक चंद्रपूर, जिल्हाधिकारी चंद्रपूर यांना दिनांक ७ मे, २०१५ रोजी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावास निधीसह प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे काय वा देण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, याबाबत होणा-या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०९-२०१५) :** (१) पर्यटन स्थळाचा विकास (Forest Park) (२४०६ २२८६) या राज्य योजने अंतर्र्गत चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपूरी येथील वनवसाहत येथे वनउद्यान तयार करण्याकरीता रु. २५६.६८ लक्ष चा प्रस्ताव उपवनसंरक्षक ब्रम्हपूरी यांनी दिनांक १८ फेब्रुवारी, २०१५ रोजी मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) चंद्रपूर यांना सादर केला आहे. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) चंद्रपूर यांनी सदरील प्रस्ताव खनिज विकास निधीच्या माध्यमातून तयार करुन दिनांक २२ मे, २०१५ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती चंद्रपूर यांना मंजूरीस्तव सादर केला आहे. सदरहू प्रस्तावास जिल्हाधिकारी चंद्रपूर यांची मंजूरी प्रतिक्षित आहे.

(२) सदरहू प्रस्तावास मंजूरी मिळण्यासाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ मे, २०१५ रोजी मा. मंत्री (वने) व सचिव (वने) यांचेकडे निवेदन दिले आहे.

(३) शासन स्तरावरुन दिनांक ११ मे, २०१५ च्या पत्रान्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), नागपूर यांना अभिप्रायासह परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जव्हार (जि.ठाणे) आदिवासी तालुक्यातील जिल्हा परिषदेने खरेदी केलेली व्हिटामिन्सची पुरवण्यात आलेली बिस्किटे मुदतबाह्य असल्याबाबत

**(१३) १६७१५ (१७-०८-२०१५). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुपोषित बालकांच्या कुपोषणाचे प्रमाण कमी व्हावे म्हणून जव्हार (जि.ठाणे) आदिवासी तालुक्यातील जिल्हा परिषदेने खरेदी केलेली व्हिटामिन्सची पुरवण्यात आलेली बिस्किटे मुदतबाह्य झाल्याचे धक्कादायक प्रकार निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनामार्फत सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी बालकांच्या आरोग्याशी खेळ करणा-या संबंधित अधिका-यासह कंपनीच्या मालकांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४), प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात खाजगी वापरासाठी दिलेल्या हजारो हेक्टर वनजमिनीची तपासणी करणारी स्वतंत्र व्यवस्थापन नसल्याबाबत

**(१४) १६८६६ (१७-०८-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खाजगी वापरासाठी दिलेल्या हजारो हेक्टर वनजमिनीचा योग्य वापर होतो किंवा नाही याची तपासणी करणारी स्वतंत्र व्यवस्थापन नसल्याने अनेक ठिकाणी या जमिनींचा गैरवापर सुरु झाला असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन कायदा १९८० नुसार वनजमिनीचे हस्तांतरण करण्यास राज्य सरकारांना केंद्र शासनाकडून मंजूरी दिली जाते संरक्षण, रुग्णालये, पिण्याचे पाणी, जलविद्युत, खाणी, सिंचन इत्यादी विविध कामांसाठी वनजमिन हस्तांतरीत करण्याची परवानगी देण्यात येते ती देतांना अनेक अटी-शर्ती लागू केल्या जातात त्यात वनजमिनीच्या खाजगी वापरामुळे होणारा प्रतिकुल प्रभाव कमी करण्यासाठी उपाययोजना सुचविल्या जातात असे असूनही या उपाययोजना करण्याबाबत संबंधित दुर्लक्ष करीत असल्याचे या वनजमिनीचा गैरवापर सुरु होतो हे टाळण्याकरीता शासन त्वरीत आवश्यक कार्यवाह करणार वा करत आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही.
राज्यात वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वनजमिनीचे वनेत्तर वापरासाठी एकूण १६०१ प्रस्तावांना व त्यातील ६१२९२.१०३६ हे. वळतीकरणाची मान्यता प्राप्त झाली आहे. वळतीकरण केलेल्या क्षेत्राचा वापर योग्य होत असल्याची खात्री करणे विभागातील क्षेत्रिय वनाधिका-यांची प्राथमिक जबाबदारी आहे. क्षेत्रिय वनाधिका-यांकडून असे जमिनीचे गैरवापर होत असल्याबाबत कोणताही अहवाल प्राप्त झालेला नाही.

केंद्र शासनाच्या मान्यतेने वळतीकरण करण्यात आलेल्या वनक्षेत्राचे योग्या व्यवस्थापन व संनियंत्रण तसेच घातलेल्या अटी शर्तींची पूर्तता करणेकरिता प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालयात मुख्य वनसंरक्षक स्तराच्या अधिकाऱ्याची नियुक्ती शासन अधिसूचना दिनांक ३०/०७/२०१४ अन्वये करण्यात आली आहे.
(२) शासनाने वेळीच उपाययोजना केलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जिल्हयातील दहा एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालयाअंतर्गत येणाऱ्या मोठ्या व मिनी अंगणवाड्यांना पुरक आहार पुरविण्याबाबत**

**(१५) १७५९१ (१७-०८-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हयातील दहा एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालयाअंतर्गत येणाऱ्या मोठ्या व मिनी अंगणवाड्यांना पुरक आहार पुरविण्यावरील स्थगिती उठली असली तरीही बेलापूर कार्यालयातील अधिकारी तसेच आदेश देण्याचे टाळाटाळ करीत असल्याचे दिनांक ४ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती बेलापूर कार्यालयातील अधिकाऱ्यांवर शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-१०-२०१५) :** (१) व (२), हे खरे नाही.

तथापि, THR उत्पादन केंद्राची तपासणी करणेसाठी समिती गठीत करण्यात आलेली असून सर्व THR उत्पादन केंद्राची तपासणी करण्याबाबत दि.१०/०३/२०१५ च्या पत्रान्वये शासनाने निर्देश दिलेले आहे. त्यानुसार आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी त्यांच्या दि. १३/०४/२०१५ च्या पत्रान्वये सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हास्तरीय आहार समिती यांना तालुकानिहाय THR उत्पादन केंद्राची समिती स्थापन करुन सदर THR उत्पादन केंद्राची तपासणी करुन जिल्हयाचा पूर्ण संकलित अहवाल सादर करणेबाबत

कळविण्यात आले आहे. एकूण २३ जिल्ह्यांचे तपासणी अहवाल आयुक्त कार्यालयामार्फत प्राप्त झाले असून सदर बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

सध्यस्थितीत राज्यातील ५५३ प्रकल्पांपैकी ३१४ प्रकल्पांमध्ये स्थानिक महिला बचत गट /महिला मंडळ /ग्राम समुदाय यांची जिल्हास्तरीय आहार समितीमार्फत निवड करुन त्यांचेमार्फत THR आहार पुरवठा सुरु आहे. उर्वरित २४९ प्रकल्पांपैकी घरपोच आहार (THR) चा पुरवठा करण्यासाठी पात्र ठरलेल्या परंतु अद्यापपर्यंत पुरवठा आदेश न दिलेल्या ६४ महिला बचत गटांना निविदेतील अटी व शर्तीच्या अधिन राहून कार्यादेश देणेबाबत आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांना दि. २५/०८/२०१५ च्या शासन पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी त्यांच्या दि. २६/०८/२०१५ च्या पत्रान्वये सर्व जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हास्तरीय आहार समिती यांना कळविले आहे. उर्वरित प्रकल्पांमध्ये सक्षम बचत गटांची जिल्हास्तरीय आहार समितीमार्फत निवड न झाल्याने व सदर प्रकल्पामध्ये पोषण आहारात खंड पडून लाभार्थी पोषण आहारापासून वंचित राहू नये म्हणून पूर्वीच्या ३ महिला संस्थामार्फत THR आहार पुरवठा सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भोर (जि.पुणे) तालुक्यात 'बालवाडी ताई' म्हणून कार्यरत असलेल्या महिलांना 'अंगणवाडी सेविका' पदावर नियुक्त करण्याबाबत

**(१६) १७७३१ (१७-०८-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर (जि.पुणे) तालुक्यात 'बालवाडी ताई' म्हणून कार्यरत असलेल्या सातवी पास महिलांना 'अंगणवाडी सेविका' पदावर नियुक्त करावे व त्यांना मासिक पाच हजार रुपये मानधन दयावे व पेन्शन विमा योजना लागू करावी इ. मागण्यासाठी मुंबईतील आझाद मैदानावर दिनांक १ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास बालवाडी ताई आमरण उपोषण करणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त बालवाडी ताईच्या मागण्यावंर शासनाने निर्णय घेवून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, काहीच कार्यवाही केली नसल्यास, होणा-या विलबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-१०-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) भोर तालुक्याकरिता एकूण ४४ मिनी अंगणवाडी केंद्रांना मंजूरी देण्यात आली आहे. सदर मिनी अंगणवाडी पदाच्या भरतीकरिता दिनांक २३/०२/२०१५ अन्वये दिलेल्या जाहिरातीद्वारे २ उमेदवारांची नेमणूक करण्यात आली आहे. दिनांक १३/०४/२०१५ रोजी दिलेल्या जाहिरातीद्वारे ०६ पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली आहे. उर्वरित ३६ मिनी अंगणवाडी पदाकरिता दिनांक १९/०६/२०१५ रोजी जाहिरात देण्यात आली असून भरतीप्रक्रिया सुरु आहे. सदर

बालवाडी ताई हया शैक्षणिक अहर्ता पूर्ण करत नसल्याने त्यांना मिनी अंगणवाडी सेविका म्हणून सामावून घेता येत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**म्हैसमाळ व दौलताबाद (जि.औरंगाबाद) येथे वन विभागांतर्गत उद्यानात पिण्याच्या पाण्यासह पर्यटकांना आवश्यक असलेल्या सोयी सुविधा उपलब्ध नसल्याबाबत**

**(१७) १८०४७ (१४-०८-२०१५). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने औरंगाबाद जिल्हयातील म्हैसमाळ व दौलताबाद येथे वन विभागांतर्गत लाखो रुपये खर्च करून तयार केलेल्या उद्यानात प्रवेशासाठी आलेल्या प्रत्येक पर्यटकांकडून शुल्क आकारण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वन उद्यानात पर्यटकांना पिण्याचे पाणी व इतर मुलभूत सुविधा वन खात्याने उपलब्ध करून न दिल्यामुळे खाजगीरित्या व्यवसाय करणारे दुकानदार पर्यटकांकडून भरमसाठ किंमत आकारुन लूट करीत असल्याच्या तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधी वन विभागाकडे वारंवार निवेदन देऊन केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने वन उद्यानात पिण्याच्या पाण्यासह पर्यटकांना आवश्यक असलेल्या सोयी सुविधा उपलब्ध करून न देण्याची कारणे काय ? वा त्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,
(४) अद्याप तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु काही नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०९-२०१५) :** (१) वनक्षेत्रातील निसर्ग्ग पर्यटन या राज्य योजने अंतर्र्गत म्हैसमाळ येथे पर्र्यटन विकासाची कामे करण्याकरिता सन २००८-०९ ते २०१३-१४ या कालावधीत रु. १,३७,३६,८८९/- इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच दौलताबाद येथील विकास कामांसाठी सन २००८-०९ ते सन २०११-१२ या कालावधीत एकूण ९१,००,९३४/- इतका निधी मंजूर करण्यात आलेला आहे.

सदरहू उद्यानांचे व्यवस्थापन करण्याकरिता संयुक्त वन व्यवस्थापन समित्याच्या वतीने अभ्यागंताकडून प्रति व्यक्ती अनुक्रमे रु.५/- आणि रु.२/- असे प्रवेश शुल्क आकारण्यात येते.
(२) पर्यटकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी म्हैसमाळ येथे तीन टाक्या तसेच दौलताबाद वन उद्यान येथे एक टाकी बसविण्यात आली आहे. या दोन्ही ठिकाणी अभ्यागंतासाठी पिण्याचे पाणी व स्वच्छतागृहे उपलब्ध आहे.

वरील दोन्ही ठिकाणी कंत्राटीपध्दतीवर उपहारगृहाची व्यवस्था करण्यात आली असून, खाजगी व्यवसायीक भरमसाठ किंमती आकारुन लूट करीत असल्याच्या तक्रारी लोक प्रतिनिधीनी केल्याचे दिसून येत नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात बालगुन्हेगारांकडून मोठ्या प्रमाणात गुन्हे घडत असल्याने बालगुन्हेगारांचे वय १८ वर्षावरून १६ वर्ष करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असल्याबाबत**

**(१८) १९०९१ (१४-०८-२०१५).श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात बालगुन्हेगारांकडून मोठ्या प्रमाणात गुन्हे घडत असल्याने बालगुन्हेगारांचे वय १८ वर्षावरून १६ वर्ष करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार बालगुन्हेगारांचे वय १६ वर्ष करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २००० व सुधारीत अधिनियम २००६ नुसार "बाल" किंवा "मूल" याचा अर्थ ज्यास वयाची अठरा वर्षे पूर्ण झालेली नाहीत अशी व्यक्ती असा आहे.

बालगुन्हेगारांचे वय १८ वर्षावरुन १६ वर्ष करणे किंवा त्यामध्ये बदल करणे ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीत येते.

(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मूळ जमिन मालकाच्या सातबारा उताऱ्यावरील खाजगी वन जमिन काढून मूळ मालकाचे नाव लावण्याबाबत**

**(१९) १९३४६ (१७-०८-२०१५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २००५ मध्ये वन कायद्याद्वारे कलम ३५/३ अनुसार महाराष्ट्र शासनाने सुमारे ६ लाख हेक्टर जमीन खाजगी वन जमिन म्हणून घोषित केल्याने या जमिनीच्या मूळ मालकांचे नाव काढून सदर सातबारा उताऱ्यावर खाजगी वन जमिन असे नाव चढविण्यात आल्याने जमिनीच्या मुळ मालकाला अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती मूळ जमिन मालकाच्या सातबारा उताऱ्यावरील खाजगी वन जमिन काढून मूळ मालकाने नाव लावण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच उपाययोजना व कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०९-२०१५) :** (१) महाराष्ट्र खाजगी वन (संपादन) अधिनियम, १९७५ हा दिनांक ३०.८.१९७५ रोजी राज्यात अस्तित्वात आला. त्यानुषंगाने सर्व खाजगी वने संपादित व शासन विहित होऊन "मानीव राखीव वने" झाली आहे. मा.उच्च न्यायालयाच्या पी.आय.एल. क्र.७१/२००२ दिनांक २२.६.२००५ चे आदेशानुसार या खाजगी वनासंदर्भात महसूली अभिलेखात वने म्हणून नोंदी घेण्यात आलेल्या आहेत.

त्या जागेच्या वनेत्तर वापराकरिता वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या तरतुदी लागू होतात व त्यासाठी केंद्र शासनाची पूर्व परवानगी घेणे जरुरी ठरते. परंतु या वनजमिनीचा पारंपरिक वापर किंवा त्यातील सुरुवातीपासून चालू असलेले शेती कामाकरिता कसल्याही अडचणी येत नाही.

(२), (३) व (४) मा.सर्वोच्च न्यायालयाने मे.गोदरेज अँड बॉईस कंपनी प्रा.लिमिटेड व इतर यांनी दाखल केलेल्या याचिकेत दिनांक ३०.१.२०१४ रोजी निकाल दिला असून सदर निकाल इतर प्रकरणात लागू करता येईल किंवा कसे, याबाबत विधी व न्याय विभागामार्फत महाधिवक्ता (AG) यांचे अभिप्राय घेण्यात येत आहे. सदर अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

---

## राज्यात भीक मागण्याच्या धंद्यासाठी लहान मुलांचे अपहरण, मुलांचा छळ, त्यांच्यावर गुंगी-झोपेच्या औषधांचा मारा या बाबी रोखण्याबाबत

**(२०) १९७३२ (१४-०८-२०१५). श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात भीक मागण्याच्या धंद्यासाठी लहान मुलांचे अपहरण, मुलांचा छळ, त्यांच्यावर गुंगी-झोपेच्या औषधांचा मारा या बाबी रोखण्यासाठी लहान मुलांच्या अभिरक्षणासाठी लेकुरवाळया भिक्षेकरी महिला व त्यांच्याकडील मुलांनी डीएनएन चाचणी घेण्याचा प्रस्ताव राज्याच्य महिला व बालकल्याण विभागाने तयार केला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी किती खर्च अपेक्षित आहे व या प्रस्तावाचे स्वरुप काय आहे व त्यावर शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(३) असल्यास, त्याची अंमलबजावणी झाली आहे काय,

(४) अदयापही या प्रस्तावर निर्णय झाला नसल्यास, याबाबतची सदयस्थिती काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### डोणगाव (जि.बुलडाणा) जळतपणाच्या नावावर करण्यात आलेली अवैध वृक्षतोड

**(२१) १९७६० (१४-०८-२०१५). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोणगाव (जि.बुलडाणा) येथे माहे मे, २०१५ च्या सुमारास जळतपणाच्या नावावर अवैध वृक्षतोड करुन तोडलेल्या लाकडाची परराज्यात विक्री होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी आतापर्यंत किती जणांना अटक केली व त्यांचेवर कोणत्या कलमान्वये कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, यास जबाबदार असणा-या वन विभाग व महसूल विभागातील अधिकारी व कर्मचा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### अमरावती जिल्ह्याच्या इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजनेचे अनुदान प्रलंबित राहिल्याबाबत

**(२२) २०४६८ (१७-०८-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्याच्या १४ तालुक्यातील इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजनेचे अनुदान माहे जून २०१३ पासून तब्बल २ वर्ष निधी कोषागारात प्रलंबित राहिल्यामुळे हजारो गरजू महिला त्यांच्या हक्काच्या अनुदानापासून वंचित राहिल्याबद्दल स्थानिक लोकप्रतिनिधी अचलपूर यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिनांक ८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास विचारणा केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-१०-२०१५) :** (१) हे अशंतः खरे आहे.

यासंदर्भात सन्माननीय विधानसभा सदस्य (अचलपूर) यांनी मा.मंत्री (म.व बा.वि.) यांना दि.०८/०१/२०१५ रोजी निवेदन दिले होते. सदर निवेदनाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबतची वस्तूस्थिती मा.सदस्यांना मा.मंत्री (म.व बा.वि.) यांचे स्तरावरुन दि.२५/०३/२०१५ च्या पत्रान्वये कळविण्यात आली आहे.

(२) व (३), सन २०१३-१४ या आर्थिक वर्षामध्ये इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजनेअंतर्गत प्राप्त अनुदान लाभार्थ्यांना त्याच वर्षात वाटप करण्यात आले आहे. तसेच सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात अनौपचारिक संदर्भाअभावी कोषागारातून देयकांना आक्षेप लावल्यामुळे काही

महिने प्रलंबित होते. अनौपचारीक संदर्भ प्राप्त होताच सदरचे अनुदान कोषागारातून आहरीत करुन सर्व लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परभणी जिल्हयातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांना गेल्या ९ महिन्यापासून वेतन मिळाले नसल्याबाबत**

**(२३) २०५०१ (१४-०८-२०१५). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दररोज सकस आहार देऊन शिक्षणाची गोडी लागावी यासाठी आंगणवाडी सुरु करुन संपूर्ण शिक्षणाचा भार सोसणा-या आंगणवाडी कर्मचा-यांना परभणी जिल्हयात गेल्या ९ महिन्यापासून वेतन दिले गेले नाही, हे खरे आहे काय,
(२) आंगणवाडी चालविणा-या शिक्षिका सोबती व मदतनीस यांना देण्यात येणारे मानधन मिळाले नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे हे खरे आहे काय, याबाबत परभणी जिल्हयातील पुर्णा तालूक्यासह अनेक तालूक्यातील अंगणवाडी कर्मचा-याकडून शासनाबद्दल संताप व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व तदनुसार संबंधित अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे वेतन मिळण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

नियमित केंद्र शासनाचे मानधन माहे मार्च-एप्रिल, २०१५ पर्यंत अदा करण्यात आलेले आहे. तसेच वाढीव राज्य मानधन माहे मे-जून, २०१५ पर्यंत अदा करण्यात आले आहे. तसेच पावसाळी अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे, मंजूर निधी रु.२२८ कोटी पैकी रु.१५९.८९ कोटी निधी दिनांक ०९ सप्टेंबर, २०१५ रोजी वितरीत करण्यात आला असून प्रलंबित मानधन अदा करण्यासाठी कार्यवाही सुरु आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पा अंतर्गत येणाऱ्या कोअर झोन हद्दीतील नागरीकांना गॅस वरील सवलत प्रलंबित असल्याबाबत**

**(२४) २१३९७ (१४-०८-२०१५). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पा अंतर्गत येणाऱ्या कोअर झोन हद्दीतील निस्तार हक्क लागू असलेल्या वन भूभागामधून नागरीकांना इंधनासाठी वैरण तोडण्यास मज्जाव करण्यात आल्याने वन विभागामार्फत दैनंदीन वापराकरीता इंधनाचा गॅस सवलतीच्या दरात वाटप करण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सवलतीच्या दरात मिळणाऱ्या इंधन गॅसवरील ओ.बी.सी व इतर प्रवर्गातील लाभार्थ्यांना देण्यात येणारी सवलत बऱ्याच दिवसांपासून प्रलंबीत असून अनेक गावांना सवलतीचा निधी उपलब्ध न झाल्यामुळे इंधनाचा गॅस वितरीतच झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नागरीकांना वन विभागामार्फत इंधन गॅसचे वितरण तसेच ओबीसी व इतर प्रवर्गातील लोकांना इंधन गॅसच्या सवलतीचे वाटप सुरळीत होण्यासाठी उपाययोजना करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, उपाययोजना न करण्याची कारणे काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०८-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) ताडोबा -अंधारी व्याघ्र प्रकल्पातील फक्त रानतळोधी, पळसगांव व कोळसा ही गावे कोअर क्षेत्रात मोडतात. या गावांच्या ऐच्छिक पुनर्वसनाची प्रक्रिया सुरु आहे. पळसगांव येथील ९३ लाभार्थ्यांना (१०० टक्के लाभार्थ्यांना) इंधनाचा गॅस सवलतीच्या दरात वितरीत करण्यात आला आहे. तसेच पुरवठा करण्यात आलेल्या इंधन गॅससाठी सवलतीचे दरात गॅस हंडा (सिलेंडर गॅस) भरुन पुरवठा करण्यात येत आहे. रानतळोधी गावातील ग्राम परिस्थितीकीय विकास समितीने (Village Eco Development Committee) सूक्ष्म आराखड्यास सहमती दर्शविली नसल्याने तसेच "कोळसा" या गावातून इंधनाच्या गॅससाठी प्रतिसाद नसल्याने या गावांत इंधनाच्या गॅसचा पुरवठा करण्यात आला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा व कोकणातील रत्नागिरी अशा ४ जिल्ह्यांमध्ये सह्याद्री व्याघ्र प्रकल्प उभारण्याबाबत**

**(२५) २१७२४ (१४-०८-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा व कोकणातील रत्नागिरी अशा ४ जिल्ह्यांमध्ये सह्याद्री व्याघ्र प्रकल्प उभारण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतल्याची बाब माहे मे २०१५ दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात कोयना अभयारण्य व चांदोली राष्ट्रीय उद्यान यांच्यासह एकूण ८३ गावांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास उक्त बाब १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने सह्याद्री व्याघ्र प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी शासन कार्यवाही करणार आहे वा केली आहे,
(५) नसल्यास, कार्यवाहीत होणा-या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०९-२०१५) :** (१) दिनांक २१.०८.२००८ रोजी राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांनी पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा व कोकणातील रत्नागिरी अशा ४ जिल्हयामध्ये सह्याद्री व्याघ्र प्रकल्प उभारण्यास तत्वतः मान्यता दिलेली आहे. त्यानुसार दि. ०५ जानेवारी २०१० च्या शासन निर्णयान्वये सह्याद्री व्याघ्र प्रकल्प घोषित केला आहे.
(२) सन २०१० च्या अधिसुचनेनुसार सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात कोयना अभयारण्य व चांदोली उद्यानातील एकूण ८३ गावांचा समावेश करण्यात आला आहे. तथापि सन २०१२ च्या कोर व बफर क्षेत्राचे अधिसूचनेनुसार सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात नव्याने ६० गावांच्या क्षेत्राचा समावेश करण्यात आला आहे.
(३) वन्यजीव (संरखण) अधिनियम, १९७२ अंतर्गत संरक्षित क्षेत्रासाठी कलम १९ ते २४ तर कोर व बफर क्षेत्रासाठी कलम ३३ व ३८ मधील तरतूदीप्रमाणे तज्ञ समिती गठीत करुन चौकशी करण्यात आलेली आहे.
(४) व (५) व्याघ्र प्रकल्प ही स्थायी बाब असून सह्याद्री व्याघ्र प्रकल्पासाठी सन २०१३-१४ ते २०२२ - २०२३ या कालावधीसाठी व्याघ्र संवर्धन आराखडा तयार करुन त्यास राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाची मंजूरी घेणेत आली आहे. तसेच सह्याद्री व्याघ्र प्रतिष्ठानाचे गठण करण्यात आले आहे. या व्यतिरिक्त व्याघ्र प्रकल्प क्षेत्राचे नियंत्रणाखाली असलेले बफर क्षेत्र व कर्मचारी एकीकृत नियंत्रणाखाली आणण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**कोयना (ता.पाटण, जि.सातारा) अभयारण्यांतर्गत मळे, कोकणे,**
**पाथरपुंज या गावांचे अद्यापही पुनर्वसन न झाल्याबाबत**

**(२६) २१८७० (१४-०८-२०१५). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाटण विधानसभा मतदासंघामध्ये कोयना अभयारण्या व सह्याद्री वाघ्र प्रकल्पातंर्गत मळे, कोळणे व पाथरपुंज ही तीन गावे प्रकल्पाग्रस्त असून या गांवातील ग्रामस्थ व महिला गेली अनेक वर्षे जीव मुठीत घेवून जीवन जगत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बाधित गांवानी आमचे मतदारसंघातच पुनर्वसन करावे याकरीता राज्य शासनाकडे अद्यावत प्रस्ताव सादर केला आहे. सन १९८६ पासून पुनर्वसनाच्या प्रतिक्षेत असणारे बाधित प्रकल्पग्रस्तांचे अद्यापही पुनर्वसन झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोयना अभयारण्य व सह्याद्री व्याघ्र प्रकल्पांतर्गत बाधित असणाऱ्या या मळे, कोळणे व पाथरपुंज येथील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनाबाबत राज्य शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, अद्याप याबाबत राज्य शासनाने निर्णय घेतला नसल्यास निर्णय घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) सदर गावांचे पुनर्वसन करण्याकरीता पर्यायी जमीन शोधणे व गावांच्या मुलभूत माहितीचे संकलन चालू असून गावांची पुनर्वसन प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

---

**सिंदखेडराजा तालुक्यातील सोनोशी शिवारापासून पिंपरखेड पर्यत असलेल्या जंगलामध्ये वृक्ष तोड होत असल्याबाबत**

**(२७) २२३२८ (१४-०८-२०१५). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंदखेडराजा तालुक्यातील सोनोशी शिवारापासून पिंपरखेड पर्यत असलेल्या जंगलामध्ये मोठा प्रमाणावर वृक्ष तोड होत असून जंगलाची वन्य प्राण्याची सुरक्षा धोक्यात आल्याची तक्रार दिनांक १ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास श्री.पंजाबराव खरात यांनी स्थानिक अधिकाऱ्यांकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यातील दत्त मंदिर बिलोली (ता.बिलोली) या पर्यटन व तिर्थस्थळाचा वन पर्यटन केंद्र म्हणून विकास करण्याबाबत**

**(२८) २२६५९ (१४-०८-२०१५). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील दत्त मंदिर बिलोली (ता.बिलोली) या पर्यटन व तिर्थस्थळाचा विकास करण्याच्या दृष्टिने शासनाने या स्थळाचा वन पर्यटन केंद्र अंतर्गत समावेश केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वन पर्यटन केंद्र अंतर्गत कोण कोणती विकास कामे मंजूर करण्यात आली आहेत वा करण्यात येणार आहेत,
(३) अद्यापी, विकास कामे मंजूर करण्यात आली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०९-२०१५) :** (१) वन क्षेत्रामध्ये पर्यटन स्थळाचा विकास या राज्य योजनेंतर्गत नांदेड जिल्ह्यातील दत्त मंदिर बिलोली (ता.बिलोली) या पर्यटन व तिर्थस्थळाचा विकास करण्याच्या दृष्टिने आवश्यक प्रस्ताव सादर करण्याबाबतच्या सूचना शासनस्तरावरुन दि. २७.०३.२०१५ च्या पत्रान्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) नागपूर यांना देण्यात आल्या आहेत.
(२) सदरहू पर्यटन स्थळाचा विकास करण्यासाठी आराखडा तयार केला असून यामध्ये वनक्षेत्रा सभोवती चेनलिंग फेनसिंग, रोपवनाची निर्मिती, मृदसंधारणार्ऱ्थ कामे, कमान उभारणे, बालउद्यान निर्मिती, निरीक्षण मनोरे उभारणे, प्रसाधनगृहे बांधणे इत्यादी कामाचा अंतर्भाव करण्यात आला आहे.
(३) सदर आराखड्यास प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या सल्लागार समितीची मंजूरी प्रतिक्षित आहे.

---

**जळगांव शहरातील बालनिरिक्षण गृहातील कर्मचाऱ्यांचा छळाला कंटाळून**
**एक मुलगी बालसुधारगृहातून पळून गेल्याबाबत**

**(२९) २३००६ (१७-०८-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव शहरातील बालनिरिक्षण गृहातील एका मुलीने पळ ठोकला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मुलीने बाल निरिक्षण सुधारगृहातील कर्मचाऱ्यांच्या अनन्वीत छळाच्या विरोधात आवाज उठविल्याने तिला त्रास देणे, उपाशी ठेवणे असे प्रकार घडू लागले हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या मुलीला त्रास देणाऱ्या कर्मचाऱ्यांवर शासन काय कार्यवाही करणार आहे व बाल निरिक्षण गृहातील सुधारण्यासाठी शासन काय उपाययोजना करणार आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-१०-२०१५) :** (१) नाही.
मुलीने पळण्याचा प्रयत्न केला पण तिला लगेच ताब्यात घेण्यात आले.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील आधारश्रमातील एस.ए.ए.च्या दोन्ही युनिटच्या सन २००९ पासून प्रलंबित असलेल्या अनुदानाबाबत**

**(३०) २३१६२ (१७-०८-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक ३० जानेवारी, २०१४ रोजी नाशिक जिल्ह्यातील आधारश्रमातील एस.ए.ए.च्या दोन्ही युनिटच्या सन २००९ पासून प्रलंबित असलेल्या अनुदानाबाबत मा.मंत्री, महिला व बालविकास यांची एकात्मिक बाल संरक्षण योजना पुणे यांना केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देवूनही आय.सी.पी.एस. ने माहे मे, २०१५ पर्यंत केद्र शासनास प्रस्ताव सादर केला नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-१०-२०१५) :** (१) आधाराश्रम नाशिक या संस्थेच्या एका युनिटसाठी एकात्मिक बाल संरक्षण योजनेंतर्गत अनुदान दिले जाते. तथापि, सदर संस्थेच्या दुसऱ्या युनिटचा अनुदान देणेबाबतचा प्रस्ताव प्रकल्प मंजूर समितीच्या बैठकीमध्ये सादर केला होता, त्याअनुषंगाने प्रकल्प मंजूर समितीने सदर संस्थेची तपासणी करुन संस्था विहित केले निकष पूर्ण करित असेल तर त्याबाबतचा प्रस्ताव प्रकल्प मंजूर समितीसमोर ठेवण्यात यावा असे निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार जिल्हा बाल संरक्षण कक्ष, नाशिक यांनी तपासणी करुन अहवाल सादर केलेला आहे. सदरचा अहवाल प्रकल्प मंजूर समितीच्या पुढील बैठकीत ठेवण्यात येईल व त्यानंतर समितीच्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोट (जि.अकोला) तालुक्यामध्ये पात्र विधवा अपंग महिलांना डावलून अपात्र लोकांची अंगणवाडी सेविका व मदतनीस पदासाठी नेमणूक केल्याबाबत**

**(३१) २३३११ (३०-०७-२०१५). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोट (जि.अकोला) तालुक्यामध्ये पात्र विधवा अपंग महिलांना डावलून अपात्र लोकांची अंगणवाडी सेविका व मदतनीस पदासाठी नेमणूक करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंगणवाडी सेविका व मदतनीस म्हणून अनेक पात्र महिलांनी अर्ज दाखल केले होते हे, खरे आहे काय, तसेच उक्त अर्जापैकी किती महिलांना कामावर घेण्यात आले आहे,

(३) असल्यास, या प्रकरणे काही अधिकारी शासनाची फसवणूक व दिशाभूल करीत आहेत, हे खरे आहे काय
(४) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तसेच दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करीत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-१०-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही.

मागील ४ वर्षापासून अकोट प्रकल्प अंतर्गत अंगणवाडी सेविका, मदतनीस यांची भरती करण्यात आली नाही. यापूर्वी सन २०१०-११ मध्ये अकोट प्रकल्पांतर्गत अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे ६३ पदाची भरती करण्यात आली होती. अंगणवाडी सेविकांच्या एकूण ७ पदाकरीता २२ अर्ज प्राप्त झाले होते व मदतनीसांच्या ५६ पदांकरिता एकूण १४५ अर्ज प्राप्त झाले होते. त्यामधून ७ अंगणवाडी सेविका व ५६ मदतनीस ही पदे महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय दिनांक ०५/०८/२०१० नुसार नियुक्त केलेल्या निवडसमिती समोर पात्र अर्जदारांची प्रत्यक्ष मुलाखात घेऊन व गुणवत्तेनुसार भरण्यात आली.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे कांदे (ता.शिराळा, जि. सांगली) येथील मच्छिमाराची मुख्य वन संरक्षक, शिराळा यांनी केलेली आर्थिक फसवणूक

**(३२) २३५५५ (१४-०८-२०१५). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कांदे, (ता.शिराळा, जि.सांगली) येथील मासेमारी करणारे श्री. भोलासाहेब मारुती गोसावी हे मासेमारी करित असताना मगरीने त्यांच्यावर हल्ला करुन त्यांना गंभीर जखमी केल्याप्रकरणी वनविभागाकडून नुकसान भरपाई पोटी देण्यात आलेला १ लाख रुपयांचा धनादेश वटवून घेवून त्यापैकी फक्त रुपये ५० हजार श्री. गोसावी यांना देवून उर्वरित रुपये ५० हजार मा.मुख्य वन संरक्षक, शिराळ यांनी स्वतःसाठी वापरुन श्री.गोसावी यांची फसवणूक केली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतीत श्री. गोसावी यांनी मुख्य वन संरक्षक, कोल्हापूर यांना माहे मे, २०१५ मध्ये लेखी निवेदन देण्यात आल्यानंतरही श्री. गोसावी यांना अद्यापही न्याय मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबतीत शासनाने चौकशी करुन काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही, श्री. भोलासाहेब मारुती गोसावी, रा.कांदे, ता.शिराळा, जि.सांगली हे मासेमारी करीत असताना त्यांचेवर मगरीने हल्ला करुन त्यांना जखमी केल्या प्रकरणी प्रचलित शासन निर्णयान्वये संबंधितास रु. १,००,०००/- रक्कम दिनांक ०४.०३.२०१४ रोजी धनादेशाद्वारे करण्यात आली आहे.
(२) व (३) श्री. गोसावी यांनी दिनांक ०५.०५.२०१५ रोजी मुख्य वनसंरक्षक, कोल्हापूर यांचेकडे निवेदन दिले होते त्या अनुषंगाने पुढील चौकशी करण्यात आली असता श्री. गोसावी यांनी अर्थसहाय्य मिळालेले असून त्यांनी गैरसमजूतीने निवेदन केले असल्याचे निदर्शनास आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंहगड (जि.पुणे) येथे डोंगरकडयांना सुरक्षा जाळया बसविण्याबाबत**

**(३३) २३६९० (३१-०७-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंहगड (जि.पुणे) येथे माहे मे, २०१५ च्या दुसऱ्या आठवडयात आलेल्या वळवाच्या पावसात घेरा डोंगरावरुन, दगड कोसळल्याने दोन पर्यटकांना जबर मार लागला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दरडीचा धोका टाळण्याकरिता डोंगरकडयांना सुरक्षा जाळया बसविण्याचा प्रस्ताव बांधकाम विभागाला देऊन ही अद्यापपर्यंत कोणताच निर्णय घेण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, घेरा सिंहगड सुरक्षेबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपयोजना केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सदय:स्थिती काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-१०-२०१५) :** (१) सिंहगड (जि.पुणे) येथे दिनांक २१.६.२०१५ रोजी दोन पर्यटक किरकोळ जखमी झाले. या पर्यटकांना प्राथमिक उपचारासाठी नजीकच्या रुग्णालयात दाखल केले होते.
(२) सिंहगड-गोळेवाडी रस्त्यावर दरड कोसळणाऱ्या जागी सुरक्षा जाळया बसविण्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागास रु. ७५.०० लाख निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.
(३) सुरक्षा रक्षकांकडून पर्यटकांना अशा २० जागी थांबू नये, असे आवाहन सुरक्षा रक्षकामार्फत करण्यात येते. जागोजागी बोर्ड तयार करुन लावलेले आहेत. तसेच, धोकादायक जागेवर खुणा केलेल्या आहेत. सूचना बोर्ड व नो पार्किंगबाबत बोर्ड लावलेले आहेत.

---

**नांदेडच्या शहरी अंगणवाडीसाठी शिजविलेला खाऊ मेनूप्रमाणे न आणता एका छोटया डब्ब्यातून पुरवठा केल्याबाबत**

**(३४) २३७५५ (१४-०८-२०१५). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेडच्या शहरी अंगणवाडीसाठी शिजविलेला खाऊ मेनूप्रमाणे न आणता एका छोटया डब्ब्यातून पुरवठा केला जातो तथापि एकात्मिक बालविकास प्रकल्प शहरी भागाच्या अंगणवाडीवर नियंत्रण करणाऱ्या यंत्रनेचे याकडे दुर्लक्ष झाल्याचे माहे जून, २०१५ च्या पहिल्या आठवडयात वा त्यासुमारास निदर्शनासआले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बालकांना किती व कोणता आहार द्यावा याचे प्रमाण ठरलेले असते तथापि ते मोजमाप नांदेड शहरी अंगणवाडयांना लागू पडत नसून शनिवारी तर फक्त मुरमुरे दिले जात असल्याचेही उघडकीस आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पुढे संबंधितावर कोणती कारवाई केली आहे,

(४) अद्यापही याप्रकरणाची चौकशी केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) नांदेड शहरातील नागरी प्रकल्प क्र.१ अंतर्गत सकाळच्या नाष्टयामध्ये प्रति लाभार्थी उसळ-६६ ग्रॅम / गव्हाची गोड लापसी-९८ ग्रॅम/ गोड दलिया लापसी-७५ ग्रॅम/ चिवडा ८० ग्रॅम तसेच दुपारच्या गरम ताजा आहारात गोड दलिया लापसी-१२५ ग्रॅम/पौष्टीक खिचडी-७५ ग्रॅम/ खिचडी-५८ ग्रॅम/ दलित खिचडी-६५ ग्रॅम या पाककृती जिल्हा आहार समितीने ठरविलेल्या आहेत. ठरलेल्या पाककृतीनुसार निर्धारित वजनाच्या आहाराचा पुरवठा संबंधित महिला संस्थेकडून प्राप्त झाल्यावर अंगणवाडी सेविका वजनाबाबत खात्री करुन आहार स्विकारतात. शनिवारी सुध्दा सकाळचा नाष्टा व दुपारचा गरम ताजा आहार दिला जातो.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**करमाळा तालुक्यात माळढोक पक्षी अभयारण्यासाठी जमिन आरक्षित असल्याबाबत**

**(३५) २३८३१ (०६-०८-२०१५). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा तालुक्यात माळढोक पक्षी अभयारण्यासाठी जमिन आरक्षित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास आरक्षित जमिनीपैकी जातेगाव ता.करमाळा येथील गट नं.१३८ या सामाईक मालकीच्या क्षेत्रापैकी ४०० चौरस मीटर क्षेत्रास तहसिलदार यांनी अकृषीक वापरास परवानगी दिली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास याबाबत लोकशाही दिनांच्या माध्यमातून जिल्हाधिकारी यांचेकडे तक्रार दिली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास जिल्हाधिकारी यांच्याकडे केलेल्या तक्रारीवर शासनाने चौकशी केली आहे काय चौकशी नुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे कोणती ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-१०-२०१५) :** (१) हे खरे आहे.

करमाळा तालुक्यातील एकूण ३८ गावांमधील ११२३७.४९ हेक्टर खाजगी, राखीव वन व निर्वणीकरण झालेले क्षेत्र माळढोक पक्षी अभयारण्य म्हणून अधिसूचना दिनांक २७.०२.२०१२ अन्वये अधिसूचित करण्यात आलेले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) लोकशाही दिनात तक्रार प्राप्त झाली हे खरे नाही, तथापि या संदर्भात जिल्हाधिकारी, सोलापूर कार्यालयास दिनांक २०.०५.२०१५ रोजी तक्रार अर्ज प्राप्त झालेला आहे.
(४) माळढोक अधिक्षेत्रातील सदरहू गटास देण्यात आलेल्या अकृषिक वापर परवानाची नोंद फेरचौकशी घेऊन रद्द करणेत आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोण, तांदुळवाडी, गोंडगाव, पिंप्री व खाजोळा (ता.भडगाव, जि.जळगांव) या परिसरात वृक्षाची मोठ्या प्रमाणात तोड करुन लाकडाची तस्करी केल्याबाबत**

**(३६) २४०२२ (१७-०८-२०१५). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोण, तांदुळवाडी, गोंडगाव, पिंप्री व खाजोळा (ता.भडगाव, जि.जळगांव) या परिसरात वृक्षाची मोठ्या प्रमाणात कत्तल करण्यात येत असून लाकडाचे तस्करी सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद् नुसार संबंधिताविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहमदनगर बालसुधारगृहातून सहा मुलांनी सुरक्षारक्षक कर्मचाऱ्याचं नाक-तोंड दाबून पळ काढला असल्याबाबत

**(३७) २४२२१ (१७-०८-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर बालसुधारगृहातून सहा मुलांनी सुरक्षारक्षक कर्मचाऱ्याचं नाक-तोंड दाबून पळ काढला असल्याचे माहे मे २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बालसुधारगृहातून पळालेल्या मुलांचा आजवर शोध लागला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करणेत आली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची सर्व साधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-१०-२०१५) :** (१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) सदरची मुले ही गंभीर स्वरुपाच्या गुन्ह्यातील आहेत. अशा मुलांच्या पालकांशी संपर्क साधण्यात आला तथापि, मुलांना जामीन करुन घेण्यास पालक इच्छुक नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळेच सदरची मुले पालकांकडून प्रतिसाद मिळत नसल्यामुळे पळून जाण्याची संधी पाहतात व यातूनच पाणी मागण्याच्या बहाण्याने सुरक्षा रक्षकावर प्राणघातक हल्ला करुन पळून गेलेली आहेत.
पोलीसांनी मुलांचा शोध घेतला असून पळून गेलेल्या पैकी १ मुलगा मृत सापडला असून उर्वरित मुलांपैकी १७ जून रोजी १ मुलगा व १६ जुलै, २०१५ रोजी ४ मुले सापडली असून त्यांना पुन्हा संस्थेत दाखल करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## यवतमाळ जिल्हयातील जोडमोहा डेपोमधील सागवनावरील हॅमर मिळवून ते सागवान लिलावात काढल्याबाबत

**(३८) २४५९७ (१७-०८-२०१५). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्ह्यातील कळंब तालुका येथील जोडमोहा डेपोतील बनावट हॅमर मारुन असलेले सागवान वन अधिकाऱ्यांनी जप्त करुन प्रकरण उघडकीस होऊ नये म्हणून जोडमोहा डेपोमध्ये असलेल्या सागवनावरील हॅमर मिटवून सागवानाचा लिलाव करण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) तसेच, यवतमाळ जिल्ह्यातील पुसद, पांढरकवडा व यवतमाळ महसूल विभागाच्या जमिनीवरील सागवान वृक्षांची सर्रास अवैधरित्या तोड होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक २३ मार्च रोजी रामपूर येथुन पांढरकवड्याला जाणाऱ्या ट्रकने नेण्यात आलेले सागवान ट्रॉझिट पास नसल्याने राऊंड ऑफिसरने जप्त केले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर पकडण्यात आलेला ट्रक मधील सागवान नगावर ७ ते १० हॅमर मारुन जोडमोहा डेपोत जमा करुन पंचनामा केला, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणात वन अधिकारी व तस्कराचे साटेलोटे असून नगावरील हॅमर मिटवून त्या सागवानाचा लिलाव काढला, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, प्रशासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात येत आहे व आली व कसे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

तथापि, दिनांक २३.३.२०१५ रोजी मौजा वाकी ता.यवतमाळ येथील कास्तकार श्री.नामदेव गणपत आत्राम यांचे शेत सर्व्हे नं. १९५ येथे बेवारसपणे सापडलेला ९९ नग, १२.१२३ घ.मि. सागवान माल जोडमोहा अगार ता.कळंब येथे वाहतूक करण्यात आलेला आहे. त्या मालावर असलेले हॅमर मिटविण्यात आलेले नाहीत. तसेच त्या मालाची अद्याप विक्री करण्यात आलेली नाही.

(२) दिनांक २.४.२०१५ रोजी मौजा वाकी येथील कास्तकार श्री.पांडू बेहरु सुरपाम यांचे शेत स.नं.१०७ येथे बेवारस स्थितीत सापडलेला ९२-नग, ५.८७३ घ.मि. माल हा मौजे पंगडी येथील “ई” वर्ग क्षेत्रातील (महसूल क्षेत्रातील) असल्याचे प्राथमिक चौकशीमध्ये निष्पन्न झाले आहे. प्रकरणाची चौकशी सुरु आहे.

(३), (४) व (५) हे खरे नाही.

(६) मौजा वाकी येथील श्री.नामदेव गणपत आत्राम यांचे शेत सर्व्हे नं. १९५ येथे बेवारस सापडलेला साग माल ९९ नग १२,१२३ घ.मि. सागवान मालाचे प्राथमिक चौकशीत दोषी आढळलेले क्षेत्र सहायक व वनरक्षक यांना निलंबीत करण्यात येऊन त्यांचेवर कार्यवाही करण्यात येत आहे. मौजा वाकी येथील कास्तकार श्री.पांडु बेहरु सुरपाम यांचे शेत स.नं. १०७ येथील बेवारस स्थितीत आढळलेल्या सागवान-९२,५,८७३ घ.मि. मालाचे संबंधाने चौकशी सुरु असून नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## हवेली (जि.पुणे) तालुक्यात असलेल्या वन क्षेत्रावरील अतिक्रमणांना संरक्षण देण्याचा वन अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(३९) २५२१७ (१४-०८-२०१५). श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हवेली (जि.पुणे) तालुक्यातील मौजे बुर्केगाव, डोंगरगाव, लोणीकंद, फुलगाव, भावडी, डुडळगाव येथे असलेल्या राखीव वनक्षेत्रामध्ये संबंधीत वन अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधीत वन अधिकारी व कर्मचा-यांनी या अतिक्रमणांना संरक्षण देण्यासाठी, तसेच धनधांडग्या व्यक्तींनी रस्ते, फॅक्ट्री शेड्स व अन्य उद्योग केले आहेत त्यांना संरक्षण देण्यासाठी करोडो रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वनक्षेत्रातून मुरुम व दगड यांचे खोदकाम करुन इतरत्र वाहतूक केली आहे काय, तसेच वन क्षेत्राभोवती असणा-या हद्दीच्या खुणा नष्ट केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, संबंधित वन अधिकारी व कर्मचा-यांची या प्रकरणी चौकशी करुन संबंधीतांवर काय कारवाई केली आहे वा करणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-१०-२०१५) :** (१) पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील मौजे बुर्केगांव, डोंगरगाव, लोणीकंद फुलगाव, भावडी व डुडुळगांव येथे असलेल्या राखीव वनक्षेत्रामध्ये संबधीत वन अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

वनसंरक्षण कामी निष्काळजीपणा केल्याचे आढळून आल्यामुळे संबंधित वनरक्षक डोंगरगाव, वनरक्षक वाघोली, व वनपाल लोणी काळभोर यांचेवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ नियम ८ अंतर्गत दोषारोप ठेवण्यात आले आहे. यापैकी संबंधीत वनरक्षक यांचे विरुध्दची विभागीय चौकशी पूर्ण झाली असून कारवाई करणेत येत आहे. वनपाल लोणीकाळभोर यांचे बाबतीत विभागीय चौकशी चालू आहे.
(२) हे खरे नाही. संबधीत वन अधिकारी व कर्मचा-यांनी अतिक्रमणाना संरक्षण देण्यासाठी तसेच धनघांडग्या व्यक्तींनी रस्ते, फॅक्ट्री शेड्स व अन्य उद्योग केले असल्याचे व त्यांना संरक्षण देण्यासाठी करोडो रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(३) व (४) हे खरे नाही. प्रस्तुत वनक्षेत्र महसूल विभागाकडून वनविभागाचे ताब्यात आल्यावर वनक्षेत्रातून मुरूम व दगड यांचे खोदकाम करुन इतरत्र वाहतूक केलेली नाही. तसेच वनक्षेत्राभोवती असणा-या खुणा नष्ट केलेल्या नाहीत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालाड पश्चिमेकडील मालवणी परिसरातील वन विभागाच्या जागेवर भूमाफियांनी अतिक्रमण करण्यास सुरूवात केल्याबाबत

**(४०) २५२२२ (१७-०८-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालाड पश्चिमेकडील मालवणी परिसरात मालवणी खाडी, मालवणी आडपट्टा, मालवणी चर्च, अंबुजवाडी, आक्सा, रामटेकडी, एरंगळ, भाटीगाव, मार्वे, मनोरी, धारवली येथे मोठ्या प्रमाणात खारफुटी आढळून येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा परिसर वन विभागाच्या हद्दीत मोडतो, या भागातील जागेवर भूमाफियांनी अतिक्रमण करण्यास सुरूवात केली असल्याचे दिनांक ७ जुन, २०१५ व त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रात्रीच्या वेळी भूमाफिया जागेवर भराव टाकून अनधिकृत बांधकाम करीत असून नविन झोपड्या वाढत आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली, अथवा करण्यात येणार आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०९-२०१५) :** (१) हे खरे आहे. शासनाने मौजे मालवणी, मनोरी, मार्वे, ऑक्से, एरंगळ, दारिवली येथील शासकीय जमिनीवरील ५८९.४३३ हे.आर क्षेत्र भारतीय वन अधिनियम, १९२७ कलम ४ अंतर्गत ''राखीव वने'' म्हणून अधिसूचित केले आहे. तसेच खाजगी जमिनीवरील ४९.६२ हे.आर क्षेत्र ''वने'' म्हणून अधिसूचित करण्यात आलेले आहे.
(२) व (३) राखीव वने म्हणून अधिसूचित झालेले नमूद परिसरातील क्षेत्र माहे ऑक्टोबर, २०१३ मध्ये ठाणे वन विभागाकडून कांदळवन कक्षाकडे हस्तांतरीत केल्यानंतर सदर क्षेत्रात पुर्वीपासून भराव करुन अतिक्रमण केल्याचे दिसून आलेले होते. सदर अतिक्रमणा विरुध्द कायदेशीर कार्र्यवाही करण्यास येत असून अंबुजवाडी चीकूवाडी, लगूनरोड, आडवापट्टा मधील ३७६ अनधिकृत झोपड्या निष्कासित करण्यात आलेल्या आहेत. उर्वरित झोपड्याबाबत चौकशी करुन अनाधिकृत अतिक्रणाविरुध्द कार्यवाही करण्यात येणार आहे.
(४) मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई या कांदळवन संधारण घटकाकडून पुढीलप्रमाणे उपाय योजना करण्यात येत आहेत:-

१. मुंबई, नवी मुंबई परिसरातील शासकीय संरक्षित / राखीव वनांच्या हद्दी निश्चित करुन बुरूज टाकण्याचे काम वन विभागामार्फत करण्यात आले.

२. कांदळवनाच्या संरक्षणासाठी एक स्पीड बोट खरेदी करुन कांदळवन क्षेत्रात नियमित गस्त घालण्यात येते.

३. महसूल विभाग, महानगर पालिका व पोलिस विभाग यांच्या सहकार्याने विविध ठिकाणचे अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करण्यात येते.

४. जनजागृतीसाठी ठिकठिकाणी कांदळवन संरक्षणासाठी फलक लावण्यात आले.

५. जनजागृतीसाठी विविध ठिकाणी कार्यशाळा, चित्रकला स्पर्धा, वन कर्मचा-यांना प्रशिक्षण देणे, लोकसहभागातून रोपवन कार्यक्रम वन कर्मचा-यांना प्रशिक्षण देणे इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

---

**पनवेल (जि.रायगड) येथील कर्नाळा पक्षी अभयारण्याची झालेली दुरवस्था**

**(४१) २५४५४ (१७-०८-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (जि.रायगड) येथील कर्नाळा पक्षी अभयारण्यात पक्षांचा अभाव, मोडकळीस आलेले पिंजरे व अन्य दुरवस्थेमुळे अतिशय दयनीय अवस्था झाली असल्याचे माहे जून, २०१५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव पर्यटकांची संख्या कमी होवून शासनाच्या महसूलातही मोठया प्रमाणात नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महसूलात वाढ होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे

(४) असल्यास, कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) कर्नाळा पक्षी अभयारण्यामध्ये पर्यटकांची संख्या वाढत असून शासनाच्या महसूलातही वाढ होत आहे. कर्नाळा पक्षी अभयारण्यास सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये अनुक्रमे ६१०१२, ७०७१५ व ७६०८२ पर्यटकांनी भेट दिली असून सन २०१४-१५ मध्ये प्रवेश शुल्क, वाहन शुल्क व कॅमरा शुल्कापोटी रु. ४०,५०,७६० इतका महसूल शासनास प्राप्त झालेला आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### सांगली जिल्हयातील सागरेश्वर अभयारण्यात हरिण पैदास योजना राबविणेबाबत

**(४२) २५६७४ (१४-०८-२०१५). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील सागरेश्वर अभयारण्यात हरणांना पोषक असणारी हरिण पैदास योजना शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, हरिण पैदास योजना राबविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणेत येत आहे,

(४) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यातील सुकन्या योजनेचे लाभार्थी गेल्या दीड वर्षापासून लाभार्थी वंचित असल्याबाबत

**(४३) २५९७७ (१७-०८-२०१५). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुकन्या योजनेचे लाभार्थी गेल्या दीड वर्षापासून लाभार्थी वंचित असल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक जिल्हयातील सुकन्या योजने अंतर्गत किती लाभार्थी वंचित आहेत,

(३) असल्यास, या योजनेखालील लाभार्थ्यांची आयुर्विमा महामंडळाकडून चौकशी देखील झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने काही चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व तदनुसार सुकन्या योजने अंतर्गत वंचित लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) विभागीय उप आयुक्त, महिला व बालविकास, नाशिक विभाग, नाशिक यांचे कार्यालयात नाशिक जिल्हयातून एकूण १८१० लाभार्थ्यांचे प्राप्त झालेले प्रस्ताव, भारतीय आयुर्विमा महामंडळ, मुंबई यांच्याकडे योजनेचा लाभ देण्यासाठी विभागीय उप आयुक्त, महिला व बालविकास, नाशिक विभाग, नाशिक यांनी पाठविलेले आहेत.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथील बालसदन आश्रमाचे आर्थिक व्यवहार विभागीय आयुक्तांकडून थांबविण्यात आल्याबाबत

**(४४) २६०६५ (१७-०८-२०१५). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बालग्राम योजनेतंर्गत बालसदन आश्रम, नागपूर येथे सुरु आहे त्या बालसदनाचे आर्थिक व्यवहार विभागीय आयुक्तांकडून थांबविण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बालसदनाचे ४ ते ५ महिन्यापासून आर्थिक टंचाईमुळे संगोपन जवळपास थांबलेले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, बालसदन उपक्रमाला जिल्हा महिला बालविकास समितीची परवानगी दिली आहे त्या नोंदणीपत्राचे मुदत २००९ मध्ये संपली आहे. नुतनीकरणासाठी संबंधीतांकडे अर्ज केलेला आहे. विभागीय आयुक्त कार्यालयाकडे कागदपत्रे जमा केली आहे ते आतापर्यंत मिळाली नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, बालसदन नुतनीकरणाची कार्यवाही शासनाने केली आहे काय,
(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-१०-२०१५) :** (१) विभागीय आयुक्त (महसूल) तथा अध्यक्ष विदर्भ सहाय्यता समिती, नागपूर यांचेकडून संस्थेचे आर्थिक व्यवहार थांबविण्यात आलेले आहेत.
(२) नाही,

सदर संस्थेस महिला व बाल विकास विभागाची मान्यता नसून विभागामार्फत संस्थेस कोणत्याही प्रकारचे अनुदान दिले जात नाही. तसेच संस्थेने बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) सुधारित अधिनियम २००६ अंतर्गत ३४ (३) नुसार नोंदणी प्रमाणपत्रा घेतलेले नाही.
(३) संस्थेस नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबतचा परिपुर्ण प्रस्ताव व्यवस्थापकीय मंडळाने विभागीय आयुक्त (महसूल) यांचे कार्यालयाकडे सादर केला नसल्याचे उप आयुक्त (महसूल) तथा सचिव, विदर्भ सहाय्यता समिती, नागपूर यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जामनेर (जि.जळगांव) येथील जामनेर-भुसावळ रस्त्यावर वन विभागाच्या हद्दीत लावण्यात आलेल्या लिंबाच्या वृक्षाची सर्रासपणे तोड करण्यात आल्याबाबत**

**(४५) २६४३६ (१७-०८-२०१५). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जामनेर (जि.जळगाव) येथील जामनेर-भुसावळ रस्त्यावर वन विभागाच्या हद्दीत लावण्यात आलेल्या लिंबाच्या वृक्षाची सर्रासपणे कत्तल करण्यात येत असून याकडे वन विभागाच्या अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून दुर्लक्ष होत असल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद् नुसार संबंधीतांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर जिल्ह्याकडून बोर अभयारण्यात जाणाऱ्या पर्यटकांसाठी हिंगणा वन परिक्षेत्राच्या नवेगांव किंवा अडेगांव येथुन वन क्षेत्रात जाण्यास परवानगी देण्याबाबत**

**(४६) २६४५८ (०७-०८-२०१५). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्याच्या हिंगणा तालुका व वर्धा जिल्हाच्या सीमेवर असलेल्या बोर व्याघ्र प्रकल्पात नागपूर जिल्हाकडून जाणा-या पर्यटकांना वन परिक्षेत्र हिंगणा ओलांडून सुमारे ६० किमी प्रवासानंतर वर्धा जिल्ह्याच्या सीमेतुन बोर अभयारण्यात जाण्यात परवानगी आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर जिल्ह्याकडून जाणा-या पर्यटकांसाठी हिंगणा वन परिक्षेत्राच्या नवेगांव किंवा अडेगांव येथुन वन क्षेत्रात जाण्यास परवानगी देण्याबाबतचा दिनांक ०६ एप्रिल, २०१५ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन स्तरावर मान्यता देण्याची बाब विचाराधीन आहे काय,
(४) असल्यास, केव्हापर्यंत शासन मान्यता होणार आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०९-२०१५) :** (१) होय हे खरे आहे.
(२) ते (५) श्री.समीर मेघे विधानसभा सदस्य (हिंगणा) यांनी त्यांचे दि. ०६ एप्रिल, २०१५ च्या पत्रान्वये मा.मंत्री (वने) यांच्याकडे अशा प्रकारची मागणी केलेली आहे.

नागपूर जिल्ह्याकडून जाणाऱ्या पर्यटकांसाठी हिंगणा वन परिक्षेत्राच्या नवेगांव किंवा अडेगांव येथून वन क्षेत्रात जाण्यास परवानगी देण्याबाबत केंद्र शासन व राज्य शासनाच्या मार्गदर्शक तत्वे व नियमांचा अनुषंगाने प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांचे स्तरावर व्यवहार्यता तपासण्यात येत आहे.

---

**नांदेड जिल्ह्यातील अंगणवाड्यांना आयएलओ दर्जा मिळण्याबाबत**

**(४७) २६८८२ (१७-०८-२०१५). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील अंगणवाड्यांना आयएलओ दर्जा मिळावा यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न होत असतांना या अंगणवाड्यात शिकणाऱ्या लहान मुलांना दिला जाणारा पोषण आहाराचा दर्जा कसा आहे याकडे अधिकाऱ्यांचे प्रचंड दुर्लक्ष होत असल्याचे माहे जून, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नायगांव तालुक्यात पुरवठा करण्यात आलेल्या शेंगदाणा चिक्कीला बुरशी आल्याचे आढळून आले असून चिक्कीच्या पृष्ठभागावर मृत अवस्थेतील मुंगळे माशा चिकटलेल्या आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या सर्व प्रकारची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, व संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे,
(४) अशा प्रकाराला तातडीने आळा घालण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व याबाबत सद्य:स्थिती काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यातील मेळघाट येथील चंदनाची झाडे गेल्या काही वर्षामध्ये चोरी झाल्याबाबत**

**(४८) २७०६५ (१७-०८-२०१५). श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील मेळघाट येथील चंदनाची झाडे गेल्या काही वर्षामध्ये सर्व झाडे चोरुन नेल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त भाग वनविभागाच्या अखत्यारित येत असून जंगलात प्रवेश करण्यासाठी सुध्दा वनविभागाची परवानगी आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तरी सुध्दा चंदनाची चोरी मोठया प्रमाणात होत असून आज त्या जंगलामध्ये चंदनाची झाडेच नाहीत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत वनविभाग व शासन कोणतीच कारवाई करित आहे वा करणार आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०९-२०१५) :** (१) अमरावती जिल्ह्यतील मेळघाट परिसरात नैसर्गिकरित्या चंदन प्रजातीची झाडे आढळत नाहीत.
(२) मेळघाट येथील वनविभागाच्या अखत्यारितील वनक्षेत्र हा पूर्णपणे राखीव वन असल्याने त्यात प्रवेश करण्यासाठी वनाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीची आवश्यकता आहे. तथापि, स्थानिक लोकांना पूर्वीपासून प्राप्त अधिकार व सवलत उपभोगण्याची मुभा असते.
(३) व (४) सदर क्षेत्रात चंदनाची झाडे नसल्याने त्यांच्या चोरीची घटना शासनाच्या निदर्शनास आलेली नाही.

---

**विदर्भ व मराठवाड्याच्या सीमेवर असलेल्या पैनगंगा अभयारण्यातील खरबी वनपरिक्षेत्रामध्ये अवैध वृक्षतोड झाल्याबाबत**

**(४९) २७१७७ (१७-०८-२०१५). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भ व मराठवाड्याच्या सिमेवर असलेल्या पैनगंगा अभयारण्यातील खरबी वनपरिक्षेत्रामध्ये अवैध वृक्ष तोड झाल्याचे सिध्द झाल्यामूळे वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपाल व वनरक्षक यांना निलंबित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी वरिष्ठ अधिका-यांवर शासनाने काय कारवाई केली आहे वा करणार आहे,
(३) सदर पैनगंगा अभयारण्यातील खरबी वनपरिक्षेत्रालगत असलेल्या व खरबी वनपरिक्षेत्रामध्ये अवैध वृक्ष तोड शिवाय वन्य जीवांची शिकार होत असल्या प्रकरणाची चौकशी केली जाणार आहे काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-०९-२०१५) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी कोणीही वरिष्ठ अधिकारी दोषी आढळून आलेला नाही.
(३) पैनगंगा अभयारण्यातील खरबी वनपरिक्षेत्रामध्ये वन्यजीवांची शिकार झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. त्यामुळे सदर प्रकरणी चौकशी करणेचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**वन्यप्राण्यांच्या उपद्रवामुळे होणाऱ्या पिकांच्या, बागायतींच्या नुकसान भरपाई दरात वाढ करण्याबाबत**

**(५०) २७७३९ (०७-०८-२०१५). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकण तसेच उर्वरित महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना वन्यप्राण्यांच्या उपद्रवामुळे होणाऱ्या पिकांची, बागायतींची नुकसान भरपाई दिनांक २ जुलै, २०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये

देण्यात येत असून नारळासाठी रु.२०००/- सुपारीसाठी रु.१२००/- कलमी आंब्यासाठी रु.१६००/- केळीसाठी रु.४८/- व इतर फळझाडांसाठी रु.२००/- प्रमाणे नुकसान भरपाई अनुज्ञेय आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१० नंतर या दरामध्ये वाढ झालेली नसल्याने जनप्रतिनिधींकडून मागणी होत असल्याने आणि वाढलेली महागाई लक्षात घेवून सद्याच्या दरामध्ये वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर नुकसान भरपाई दरात वाढ करण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती ठोस कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०९-२०१५) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

सन २०१० च्या दरामध्ये दिनांक ०५.०९.२०१३ च्या शासन निर्णयान्वये शेतीपिके व फळबागांचे वन्यप्राण्यांनी केलेल्या नुकसानीपोटी आ करावयाच्या नुकसान भरपाईमध्ये खालीलप्रमाणे वाढ करण्यात आली आहे. नारळासाठी रु.२,४००/-, सुपारीसवाठी रु.१,४००/-, आंब्यासाठी रु.१,८००/-, केळीसाठी रु.६०/- व फळझाडांसाठी रु.२५०/- सन २०१५ मध्ये दिनांक ०९.७.२०१५ च्या शासन निर्णयान्वये नारळासाठी रु.४,८००/-, सुपारी रु.२,८००/-, आंब्यासाठी रु.३,६००/- केळीसाठी रु.१२०/- व फळझाडांसाठी रु.५००/- अशी दुपटीने वाढ करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.